## प्रमाणपत्र अभ्यासक्रम

समकालीन भारत हा एका संक्रमणातून वाटचाल करत आहे. प्रत्यक्ष समाजातील विविध संस्था ह्या परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात आहेत. परिवर्तनाच्या प्रक्रियेला समताधिष्ठित वळण देण्यासाठी प्रचलित विद्याशाखा अपुऱ्या आहेत. काही विद्याशाखांनी विकसित केलेल्या ज्ञानातूनही समतेच्या प्रस्थापनेमध्ये अडथळे निर्माण होतात. भारतीय समाजातील विविध समस्या लक्षात घेता ज्ञानशाखांना अधिक समाजाभिमुख करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा चिकित्सक अभ्यास संयुक्तिक ठरतो. म्हणूनच अभ्यास केंद्राच्या वतीने Certificate Course in Phule-Ambedkar Studies हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांव्यतिरिक्त नागरिक, शिक्षक, नोकरदार, व्यावसायिक व महाविद्यालयांतील विद्यार्थीसुद्धा पात्र आहेत. या अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता तर वाढेलच; तसेच त्यांना जीवनाकडे बघण्याचा निकोप असा दृष्टिकोनही प्राप्त होईल.

## अध्यापन व मूल्यमापन पद्धती

- आंतरविद्याशाखीय अभ्यासपद्धती
- तज्ज्ञांची व्याख्याने
- आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर
- क्षेत्राभ्यास व प्रत्यक्ष मुलाखती
- चिकित्सक दृष्टिकोनाला पुरक व संवादात्मक पद्धती
- अंतर्गत मूल्यमापन
- पर्यवेक्षित संशोधन प्रकल्प
- निबंध सादरीकरण